RNI MAHMAR
36829-2010

ISSN - 2229-4929

Peer Reviewed


# Akshar Wangmay

International Research Journal

UGC-CARE LISTED

## Folk Literature & Folk Media

FEBRUARY 2020













Executive Editor : Dr. Subash Nikam

Principal,
Mahatma Gandhi Vidymandir's
Karmaveer Bhausaheb Hiray
Arts, Science and Commerce College,
Nimgaon, Tal. Malegaon Dist. Nasik (MS)

Co- Editor : Prof. Arjun G. Nerkar

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

Address : 'Pranav', Rukmenagar,
Thodga Road, Ahmadpur, Dist. Latur 413515

ISSN : 2229-4929
February - 2020


| | | |
|---|---|---|
| 52 | लोकसाहित्य आणि समाजप्रबोधन<br>प्रा.योगिता बी. भामरे (मराठी विभाग) | 200-204 |
| 53 | लोकसाहित्य व समाजजीवन<br>डॉ. स्नेहल संजय मराठे | 205-207 |
| 54 | लोकसाहित्य अभ्यासाचा इतिहास<br>प्रा.डॉ.कांत वसंतराव जाधव | 208-212 |
| 55 | महाराष्ट्रातील लोककलेचा भौगोलिक अभ्यास विशेष संदर्भ "बोहाडा" लोककला<br>डॉ. सुनील अशोक देवरे, डॉ. एस. व्ही. ताठे | 213-216 |

# महाराष्ट्रातील लोककलेचा भौगोलिक अभ्यास विशेष संदर्भ "बोहाडा" लोककला

डॉ. सुनील अशोक देवरे
एम. एस. जी. कॉलेज मालेगाव
डॉ. एस. व्ही. ताठे
संत रामदास आर्ट सायन्स अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज घनसांगवी (जालना)

## प्रस्तावना

भौगोलिक प्रदेशानुसार जाती- जमाती, भाषा, लोक, परंपरा, चालीरिती व संस्कृती बदलत जाते, त्यामुळे प्रत्येक प्रदेशात भिन्नता आढळते, भौगोलिक दृष्टीकोनातून लोककलेचा विचार केला तर यात विभिन्न प्रदेशात भिन्न भिन्न प्रकारच्या लोककला पाहायला मिळतात. लोककला ही खूप मोठी व्यापक संकल्पना आहे प्रदेशानुसार किंवा जाती धर्मानुसार प्रत्येकाची लोककला व लोकसाहित्य हे वेगळे आहे, प्रत्येक जाती धर्मात वेगवेगळ्या प्रकारचे सण साजरे केले जातात या सणांच्या वेळी सणांच्या वेळी युवा घरात लग्न समारंभाच्या वेळी लोककला साजरी केली जातात.

महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात अनेक जाती धर्माचे लोक राहतात व प्रत्येक जाती धर्माचे लोक वेगवेगळे सण साजरे करतात व त्यानुसार लोककला देखील वेगवेगळी आहेत, महाराष्ट्रात अनेक प्रकारची लोककला बघायला मिळतात. ते म्हणजे लावणी, लेझीम, तमाशा, पोवाडा, भजन, कीर्तन, गोंधळ, भारूड, भवाडा इत्यादी अनेक अशा प्रमुख लोककला पाहायला मिळतात.

## अभ्यास क्षेत्र

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक स्थान हे देशाच्या पश्चिमेस आहे राज्याच्या अक्षवृत्तीय विस्तार १२' ४० " ते २२' ००" आहे,

तर रेखावृत्तीय विस्तार ७२' ३०" ते ८०' ३०" दरम्यान आहे. राज्याची एकूण क्षेत्रफळ सुमारे ३०७७१३ चौ किमी असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने देशात तिसरा क्रमांक लागतो.

## अभ्यास पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक

पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे, तसेच महाराष्ट्रातील बोहाडा लोककलेचा अभ्यास करण्यात आलेला आहे, या संशोधन कार्यासाठी प्राथमिक व द्वितीय सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे, प्राथमिक सामग्रीमध्ये मुलाखती व द्वितीय सामुग्रीत संशोधने निबंध, पुस्तके, मासिके, पेपर कात्रण इत्यादी द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

## उद्दिष्टे

१)महाराष्ट्रातील प्रमुख लोककलांचा अभ्यास करणे,

२) बोहाडा लोककलेचा अभ्यास करणे,

## गृहितके

१) भौगोलिक प्रदेशानुसार लोककला बदलत जाते.

## महाराष्ट्रातील प्रमुख लोककला

### लावणी-

लावणी हा महाराष्ट्रातील कलाप्रकार आहे. लावणी हा तमाशाचा हिस्सा म्हणूनही सादर करतात लावण्या कला हा कला प्रकार श्रृंगार, विरता, भक्ती या रसांचा परिपोष करण्यासाठी पूरक माध्यम समजले जाते लावणी म्हणजे गीत, नृत्य, आणि अदाकारी यांचा त्रिवेणी संगम होय, महाराष्ट्रात सर्वत्र लावणी नृत्यशैली सादर केली जाते.

पोवाडा -

पोवाडा हा वीर रसातील लेखनाचा आणि गायनाचा महाराष्ट्रातील लोकप्रिय प्रकार आहे, वीरांच्या पराक्रमाची, विद्वानांच्या बुद्धिमत्तेची तसेच एखाद्याच्या सामर्थ्याचे, गुण, कौशल्य, इत्यादी गुणांचे काव्यात्मक वर्णन प्रशस्ती किंवा स्तुती स्रोत म्हणजे पोवाडा होय.

मराठी भाषिकांचा हा एक स्फूर्ती देणारा गीतप्रकार आहे, पोवाड्यात ऐतिहासिक घटना समोर ठेऊन गीत रचना केली जाते आणि पोवाडा गाणाऱ्याला शाहीर म्हटले जाते, भारताचा विचार करता सतराव्या शतकात पोवाड्याचा उदय झाला आहे.

तमाशा -

तमाशा -गायन, नृत्य, वादन आणि विनोद यांनी युक्त असलेल्या लोकनाट्याचा एक आविष्कार आहे, साधारणता महाराष्ट्रात गावोगावी भरणार्या यात्रेनिमित्त तमाशा लोकलचे आयोजन केले जाते, तमाशाच्या एका खेळा तमाशाच्या एका खेळामध्ये गण गवळण बतावणी वग रंगबाजी व फार्स असे पाच प्रकारचे नाट्य असते

तमाशात अनेक प्रकारच्या वाद्यांचा उपयोग केला वाद्यांचा उपयोग केला जातो तमाशाचा उदय अहमदनगर जिल्ह्यातील नारायणगावला झाला व आज अख्ख्या महाराष्ट्रात तमाशा साजरा केला जाऊ लागला याचे मोठ्या प्रमाणात खान्देशमध्ये कलाकार आहेत.

भारुड -

भारुडाच्या माध्यमातून साध्या रूपांमधून धार्मिक आणि नैतिक तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य केले जाते, अनेक संतांनी समाजप्रबोधनपर भारुडे लिहिली, त्यात संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम असे अनेक संतांनी भारुडे लिहले आहेत,

भारुडाचे साधारणता तीन प्रकार पडतात भजनी भारुड, सोंगी भारुड व कुट भारुड.

गोंधळ

महाराष्ट्रात गोंधळी लोक गोंधळ हे पारंपरिक विधी नाट्य सादर करतात गोंधळी ही देवीचे उपासक असून ते गोंधळी या विधी नाट्याद्वारे मंगलकार्याची सांगता करतात यात महत्त्वाचे म्हणजे रेणूराई व कदमराई या दोन महत्त्वाच्या पोटजाती आहेत

रेणूराई म्हणजे माहूरच्या रेणुकेचे भक्त व उपासक व कदमराई

है तुळजापूरच्या भवानीचे भक्त असून तिचीच पूजा मांडतात गोंधळाची विधीनाट्य सादर करण्याला आज गोंधळ घालणे अशी संकल्पना आहे साधारणता महाराष्ट्रात लग्नाला गोंधळ घालतात. आपल्या कुलदेवतेच्या उपासना करण्यासाठी व गोंधळ

हा लग्न, मुंज, बारसे, जावळ अशा समारंभाच्या वेळी देव देवतांच्या उपासनेसाठी केलेला एक कलाचार आहे.

कीर्तन

कीर्तन वेगळया पद्धतीचे काव्य, संगीत, अभिनय यांच्यासह सादर करीत असलेल्या भक्तिरसपूर्ण कथारूप एकपात्री निवेदनाला कीर्तन असे म्हणतात,

आणि हे करणाऱ्याला करणार्या व्यक्तीला कीर्तनकार असे म्हणतात बहुधा वारकरी संप्रदायात याचा जास्त प्रमाणात उपयोग केला जातो महाराष्ट्रात पूर्वापार कीर्तनाची परंपरा चालत आली आहे यात नारदीय कीर्तन वारकरी कीर्तन असे दोन प्रकार पडतात.

भजन

भजनी देवाची स्तुतिपर काव्य रक्षणा साग्रसंगीत म्हणून देवाला भजने किंवा आळविण्यात भजन असे म्हणतात हा योगदानातील भक्तियोगाचा भाग आहे. नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा इत्यादि संतांनी अनेक भजनी तयार केली आहेत वारकरी संप्रदायात भजनांचा उपयोग अखख्या महाराष्ट्रात केला जातो.

बोहाडा एक लोककला

महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये बोहाडा हे लोकनाट्य सादर केले जाते. महाराष्ट्रातील आदिवासी भागात राहणारे लोक प्रामुख्याने ठाणे जिल्हा, नाशिक जिल्हा, नंदुरबार जिल्हा व इतर भागात बोहाडा साजरा केला जातो .

बऱ्याच आदिवासी भागात होळी पौर्णिमेनंतर आदिवासी पाड्यात रंगणारा बोहाडा एक खरोखर आनंदोत्सव असतो दारिद्र्य कुपोषण बालमृत्यू अंधश्रध्दा अनिष्ट रुढी परंपरा अशा अनेक असंख्य गोष्टींमुळे वर्षावर हतबल जीवन जगत असलेल्या आदिवासी बांधवांच्या आयुष्यातही वेदना विसरून काही आनंदाचे क्षण डोलावतात त्यामुळे लोक बळावर हे लोककला साजरी करतात.

आदिवासी लोकांच्या त्यांच्या परंपरा चालीरीती देवदेवताही वेगळ्या आहेत त्यांच्या परंपरांच्या परंपरेला बोहाडा उत्सवाला आदिवासींच्या धार्मिक जीवनात वेगळे स्थान आहे बोहाडा केला नाही तर देवाचा कोप होईल पाड्याचा विनाश होईल अन्नधान्य पिकणार नाही पाण्यावाचून लोकं तडफडून मरतील अशा अनेक भीती आदिवासीच्या मनावर लहानपणापासून कळत नकळत बिंबवली जाते त्यामुळे प्रत्येक आदिवासी बांधव या उत्सवात श्रद्धेने सहभागी होताना दिसतो चैत्र महिन्याची चाहूल लागत असताना शेतात आणि रानात फारशी कामे शिल्लक नसतात आदिवासी मोकळे असतात तेव्हाच बोहाडा साजरा करण्यास पाठीमागे धार्मिक भावनेसोबत करमणुकीसाठी उद्देश आहे गावागावांमध्ये जरूर जत्राही याच काळात साजऱ्या होत असताना दुर्गम पाड्यांवरही आदिवासीसुद्धा आपल्या ग्राम होतात रंगून जातो

होळीच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू होणारा बोहाडा म्हणजे मुखवटानाट्य तीन तीन दिवसांचा लहान्या आणि सात दिवसांचे मोठाले बोहाडे असतात यात काही नवसाचे ही असतात ,

बोहाडा सुरू होण्यापूर्वी ग्रामदेवतेचा मुहूर्त साधून देवी देवतांची मरून ते त्याला मोहाली असे म्हणतात या देवीच्या मंदिरासमोरील मोकळी जागा हेच बोहाड्याचे व्यासपीठ तिचे सारे नाट्य रंगते

एका बोहाड्यात कमीत कमी पंचवीसतीस कलावंत भाग घेतात अनेक प्रकारचे पार्ट घेतली जातात मग पुढे तारपा पिपाण्या आणि संबळ या वाद्यांच्या सुरेल कलाविष्कारावर ताल धरत सरस्वती शंखासुर त्रिपुरासुर राम शंकर मारुती खंडोबा दशमुखी रावण हनुमान अशी मुखवटाधारी पात्र नाचत असतात प्रत्येक सोंगाचे वाजवण्याचे ठेके वेगवेगळे असतात सोंग बदलते की ठेका बदलतो कलावंत देहभान विसरून मुखवटे नाचवत असतात. व शेवटी पहाटे नरसिंह हिरण्यकश्यपूची सोंग येतात देवी अंगात संचारलेला आणि चेहऱ्यावर अंबामातेचा मुखवटा धारण केलेला पुजारी वाघावर आरूढ होत त्यांच्यावर चाल करून जातो तुडुंब युद्ध उसळले आणि त्यात असुरांचा वध होतो मग देवीची मिरवणूक विजयी मिरवणूक निघते देवीपुढे नारळ वाढवून पूर्ण झालेले नवस फेडले जातात नव्याने नवस बोलण्यासाठी गर्दी उसळते

सज्जन विरुद्ध दुर्जनांच्या संघर्षात सत्याचा विजय उत्साहातून रंगवला जातो दोन दोन महिने नृत्यनाट्याची पूर्वतयारी सुरू असते या नृत्याला विशेष महत्त्व असते मुखवटे घातलेल्या व्यक्तीचे संवाद समोर बसलेल्या लोकांना ऐकू येणे शक्य नसल्याने मागे उभी असलेली व्यक्ती संवादफेक करत असते सोंग संपानंतर आदिवासी महिला आणि पुरुष फेर करून आपल्या पारंपारिक नृत्याचा आनंद लुटतात बोहाड्याचा मुख्य कथाभाग पौराणिक असला तरी आता त्यात वैदु बाळंतीण बोहारीण राजकीय पुढाऱ्यांचीही सोंगे आणली जातात काही समाज सेवा मंडळाच्या प्रयत्नातून आदिवासींचे प्रबोधन करण्याचे प्रयत्नही या उत्सवाच्या माध्यमातून केले जात आहेत त्यामुळे बोहाड्याचे स्वरूप निव्वळ दशावतारी राहिले ना सोन्याचा बाज कालपरत्वे बदलत चालल्याचेही जाणवते हा सण साजरा करण्यासाठी वर्गणी गोळा केली जाते वीस रुपयांपासून शंभर उभा प्रांत प्रियेकडून जेवढी मिळतील तेवढे घेतले जातात. महाराष्ट्रातील शेकडो वर्षाची गावाची परंपरा व संस्कृतीचे प्रतीक असलेल्या देवीच्या यात्रेनिमित्त नाशिक जिल्ह्यातील काही गावांमध्ये दर आखाजीला

ISSN : 2229- 4929
February - 2020

अक्षयतृतीयाला साजरा होणारा एक महत्त्वाचा सण समाजाचा तो हा उत्सव साजरा करण्यामागे अनेक वर्षांचा इतिहास आहे यात बरेच तर्कवितर्क सांगितले जातात मुख्य कारण म्हणजे गावातील लोक एकत्र येण्याचाप्रमुख उद्देश हाच होता पण पूर्वी असा समज होता की आपण बोहाडा सादर केल्या नाही ज्या देवीचा कोप होईल पाऊस पडणार नाही आपण कोणकोणती पिके येणार नाहीत

पूर्वी स्रिया आखाजीला माहेरी आलेल्या साहित्यामुळे मनोरंजनासाठी देखील हा सण साजरा केला जात होता व साजरा केला जातोय.

संदर्भ

१) डॉ. सरोजिनी बाबर- लोकसंगीत
२) एक होता राजा सरोजनी बाबर
३)विकिपीडिया